# दैनिक ऐक्य

68/18, प्रतापगंज पेठ, सावरकर मार्ग, सातारा - 415002

आणि

श्री मुधाईदेवी शिक्षण संस्थेचे

## प्रा. संभाजीराव कदम महाविद्यालय, देऊर

ता. कोरेगाव , जि. सातारा - 415524

या संस्थामधील

# सामंजस्य करार

# MEMORANDUM OF UNDERSTANDING

जानेवारी 2021

दैनिक ऐक्य

68/18, प्रतापगंज पेठ, सावरकर मार्ग, सातारा - 415002

आणि

श्री मुधाईदेवी शिक्षण संस्थेचे

**प्रा.संभाजीराव कदम महाविद्यालय, देऊर**

ता. कोरेगाव, जि.सातारा - 415524

उपरोक्त नमूद 'दैनिक ऐक्य' हे 68/18, प्रतापगंज पेठ, सावरकर मार्ग, सातारा - 415002 या ठिकाणाहून प्रसिध्द होणारे दैनिक वृत्तपत्र आहे. तसेच 'प्रा.संभाजीराव कदम महाविद्यालय, देऊर' हे श्री मुधाईदेवी शिक्षण संस्था, देऊर ता.कोरेगाव जि.सातारा या महाराष्ट्र शासन मान्यता प्राप्त संस्थेने 1999 मध्ये देऊर ता.कोरेगाव जि.सातारा -415524 या ठिकाणी शासन मान्यतेने सुरू केलेले पदवी व पदव्युत्तर शिक्षण देणारे वरिष्ठ महाविद्यालय असून ते शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्याशी संलग्नित आहे. या दोन्हींचा उल्लेख सदर करारामध्ये 'संस्था' असा करण्यात आलेला आहे

वरील नमूद करण्यात आलेल्या

**दैनिक ऐक्य,** 68/18, प्रतापगंज पेठ, सावरकर मार्ग, सातारा - 415002

आणि

**प्रा.संभाजीराव कदम महाविद्यालय, देऊर** ता. कोरेगाव, जि.सातारा - 415524

या संस्था दि. जानेवारी, 2021 रोजी एकमेकांबरोबर सामंजस्य करार करत आहेत. या कराराची उद्दिष्टये खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आलेली आहेत.

- **<u>उद्दिष्टये</u>**

1. भाषा, साहित्य आणि संस्कृती यांचे संवर्धन करणे.
2. चर्चासत्र, कार्यशाळा,परिसंवाद, काव्यसंमेलन, संयुक्त बैठका यांचे आयोजन करणे.
3. महाविद्यालयात राबविल्या जाणाऱ्या विविध अभ्यासक्रम प्रमाणपत्र, पदवी व पदविका कोर्ससाठी सहयोग व सहकार्य करणे
4. निबंध, वक्तृत्व, कथालेखन, काव्यलेखन, काव्यवाचन, कथाकथन स्पर्धांचे आयोजन करणे.
5. व्यक्तिमत्त्व व कौशल्य विकासाचे प्रकल्प राबविणे.
6. विद्यार्थ्यांच्या भाषिक कौशल्य विकास वाढीसाठी प्रशिक्षण कार्यक्रम राबविणे.
7. सर्जनशील लेखन व उपयोजित लेखनप्रकल्प राबविणे.

8. मुद्रितशोधन, पत्रकारिता, भाषिक कौशल्य विकास इ. अभ्यासक्रमांचे आयोजन करणे.
9. विद्यार्थ्यांना वर्तमानपत्र कार्यालयात चालणाऱ्या कामकाजाचे ऑन जाब ट्रेनिंग देणे
10. विद्यार्थ्यांना वर्तमानपत्र छपाई तंत्रज्ञान जाणून घेण्याची संधी उपलब्ध करून देणे.
11. विद्यार्थ्यांना वर्तमानपत्र कार्यालयाच्या विविध विभागांचा परिचय करून देणे. व या विभागामध्ये प्रत्यक्ष कामकाजात सहभागाची संधी उपलब्ध करून देणे.
12. वर्तमानपत्र विषयक विविध कामकाजाच्या नोकरीची तसेच व्यवसायाची संधी उपलब्ध करून देणे.
13. वर्तमानपत्राच्या संपादकीय कामकाजात सहभागाची व संपादकीय कामकाज शिकण्याची संधी उपलब्ध करून देणे.

## ▪ परस्पर सहाय्याची प्रस्तावित माध्यमे

1. परस्पर हिताच्या शैक्षणिक बाबींमध्ये तसेच प्रशिक्षणांमध्ये परस्पर सहकार्य करणे.
2. प्रशिक्षण कार्यक्रमासाठी दोन्ही संस्थांनी परस्परांना सेवा प्रदान करणे.
3. विद्यार्थी हित केंद्रीत कार्यक्रम व उपक्रमांची निश्चित योजना तयार करणे.
4. महाराष्ट्र शासन, साहित्य अकादमी, मराठी साहित्य व संस्कृती महामंडळ, राज्य मराठी विकास संस्था, विश्व कोश कार्यालय, वाई यांचे उपक्रम संयुक्तरित्या राबविणे.

## ▪ अटी व शर्थी

1. महाविद्यालय व ऐक्य वर्तमानपत्र यांनी संयुक्तपणे आयोजित केलेल्या कार्यक्रमांमध्ये, आणि उपक्रमांमध्ये दोन्ही संस्थांच्या सभासदांनी सक्रीय सहभागी होणे बंधनकारक आहे.
2. संयुक्तिकरित्या आयोजित कार्यक्रमामध्ये दोन्ही संस्थांच्या पदाधिकाऱ्यांचा उचित सन्मान राखने दोन्ही संस्थावर बंधनकारक राहील.
3. महाविद्यालयाने सामंजस्य करारातील उद्दिष्टानुरूप आयोजित केलेल्या कार्यक्रमास मिडीया पार्टनर म्हणून योग्य तो सहभाग देणे व अशा कार्यक्रमांना प्रसिध्दी देणे बंधनकारक राहील
4. दोन्ही संस्थांनी संयुक्तपणे आयोजित केलेल्या कार्यक्रमाच्या निमंत्रणपत्रिका, बॅनर व प्रमाणपत्रावर दोन्ही संस्थांच्या बोधचिन्ह, नाव यांना समान स्थान राहील.
5. परस्पर सामंजस्य कराराचे नुतनीकरण करणे आणि समाप्ती करणे यासाठी पूर्व लेखी सुचनेनुसार कोणत्याही संस्थेला सामंजस्य करार नुतनीकरण करता येईल वा संपुष्टात आणता येईल.
6. सामंजस्य कराराचा कालावधी पाच वर्षानंतर संपुष्टात येईल. परस्पर सहमतीने कराराचा कालावधी पुढे पाच-पाच वर्षासाठी वाढविता येईल. यासाठी निश्चित दिनांक व लेखी अनुमती यांची आवश्यकता दोन्ही संस्थावर बंधनकारक असेल.

- समन्वय आणि अंमलवजावणी

1. सदर कराराची जबाबदारी, समन्वय आणि अंमलबजावणीसाठी महाविद्यालयाच्या भाषा विभागांचे प्रमुख व भाषा विभागातील प्राध्यापक कार्यरत राहतील तसेच दैनिक ऐक्य सातारचे संपादक, उपसंपादक व पत्रकार कार्यरत राहतील
2. सदर सामंजस्य करार हा पाच प्रतींमध्ये अंमलात येत आहे.
3. सदरहू करार हा पुढील समन्वयिक अधिकाऱ्यात होत आहे, तसेच वर नमूद केलेल्या दिनांक व वर्षानुरूप अंमलात येत आहे.

डॉ. अशोक शेलार
प्रमुख
मराठी विभाग,
प्रा. संभाजीराव कदम महाविद्यालय,
देऊर (सातारा)

डॉ. शिवाजी चवरे
अध्यक्ष
हिंदी विभाग,
प्रा. संभाजीराव कदम महाविद्यालय,
देऊर (सातारा)

डॉ. मनोज गुजर
Head,
Deptt. of English
Prof. Sambhajirao Kadam College,
Deur (Satara)

डॉ. भारत भोसले
डॉ. बी. एन. भोसले
प्राचार्य,
प्रा. संभाजीराव कदम महाविद्यालय,
देऊर, ता. कोरेगांव, जि. सातारा.

श्री. शैलेश पळनिटकर
DAILY AIKYA
MARATHI NEWS PAPER